# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 07.02.2026** **वार- शनिवार**

---

**निवडणूक**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी मतदान शांततेत पार पडलं. या निवडणुकीसाठी मान्यवरांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बारामतीमधल्या काटेवाडी इथं मतदानाचा हक्क बजावला. मंत्री दत्तात्रय भरणे यांनी इंदापूर तालुक्यात भरणेवाडी इथं मतदान केलं.

सातारा जिल्हा परिषद आणि 11 पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी दुपारी साडे तीनपर्यंत 51 टक्के मतदान झालं होतं.

सांगली जिल्हा परिषदेच्या 61 गट आणि पंचायत समितीच्या 122 गणासाठी शांततेत मतदान झालं. सकाळी साडेसात ते दुपारी साडेवतीन वाजेपर्यंत 51 पूर्णांक 47 टक्के मतदानाची नोंद झाली. सर्वाधिक मतदान वाळवा तालुक्यात 58 पूर्णांक 59 टक्के मतदान झालं आहे. कवठेमहांकाळ तालुक्यात 45 पूर्णांक 19 टक्के मतदानाची नोंद साडेतीन वाजेपर्यंत झाली.

कोल्हापूर जिल्ह्यात दुपारी दीड वाजेपर्यंत ४३ पूर्णांक ९५ टक्के मतदानाची नोंद झाली. मतदान प्रक्रिया अभूतपूर्व उत्साहात सुरू होती. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी विविध मतदान केंद्रांना प्रत्यक्ष भेट देत मतदान प्रक्रियेची आणि व्यवस्थेची पाहणी केली.

**वायकॉम**

केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या अखत्यारीतील पुण्यातील वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेच्या पदव्युत्तर पदविका व्यवस्थापन – कृषी व्यवसाय व्यवस्थापन या अभ्यासक्रमाच्या 2023-25 च्या तुकडीचा वार्षिक दीक्षांत समारंभ आज झाला. यावेळी मुख्य अतिथी म्हणून बोलताना सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी वैकुंठ मेहता संस्थेच्या पदवीधरांना विश्वासार्हता आणि नवोन्मेषाच्या बळावर सहकार चळवळीचं नेतृत्व करण्याचं आवाहन केलं. या समारंभात 93 विद्यार्थ्यांना कृषी व्यवसाय आणि व्यवस्थापन अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर पदविका प्रदान करण्यात आली. त्यांच्या हस्ते एकतिसाव्या तुकडीतील तीन गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्णपदकं आणि पदवी प्रदान करण्यात आली.

**अंदाजपत्रक**

पिंपरी चिंचवड महापालिकेचं अंदाजपत्रक 20 फेब्रुवारीला स्थायी समितीसमोर सादर करणं आवश्यक असतं. मात्र प्रशासकीय राजवटीनंतर इतक्या कमी कालावधीत स्थायी समिती अस्तित्वात येत नसते त्यामुळं, अंदाजपत्रक सादर करण्यासाठी मुदत वाढवून घेणार असल्याचं पालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी सांगितलं. नऊ वर्षानंतर पुन्हा महापालिकेत नगरसेवकांची लगबग सुरू झाली. सलग दुसऱ्यांदा भारतीय जनता पक्ष सत्तेवर आला आहे. महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवड झाली असून प्रशासकीय राजवटीनंतर लोकप्रतिनिधी कार्यरत झाले आहेत. मात्र अद्याप स्थायी समिती अस्तित्वात आली नसून अंदाजपत्रक सादर करता येत नाही. त्यामुळं राज्य शासनाकडून मुदतवाढ घेण्यात येणार आहे. मालमत्ता कर ,पाणीपट्टी कर संदर्भात अंदाजपत्रकात काय तरतुदी असतील, याविषयी नागरिकांमध्ये उत्सुकता आहे.

**यशस्वी**

यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन विज्ञान संस्थेनं आयोजित केलेला माजी विद्यार्थी मेळावा नुकताच उत्साहात संपन्न झाला. माजी विद्यार्थी, संस्थेतील प्राध्यापक वर्ग आणि सध्या शिक्षण घेत असलेले विद्यार्थी यांच्यातील परस्पर स्नेहबंध दृढ व्हावा, या उद्देशानं हा माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता, असे संस्थेचे संचालक डॉक्टर शिवाजी मुंढे यांनी सांगितलं. शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांचा माजी विद्यार्थ्यांशी संवाद घडवून आणणं, शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांच्या मौल्यवान सूचना मिळवणं आणि माजी विद्यार्थ्यांचे अनुभवी मार्गदर्शन प्राप्त करणं या मेळाव्यांमुळं शक्य होतं, असेही डॉक्टर मुंढे यांनी यावेळी सांगितलं.

**फुटबॉल**

ए आय एस एस एम एस, कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगच्या वतीनं पुण्यात राजर्षी शाहू महाराज क्रीडा महोत्सव सुरू आहे. या स्पर्धेत राज्यभरातील 1500 खेळाडूंनी भाग घेतला होता. संस्थेचे अध्यक्ष भगवान साळुंखे यांच्या हस्ते बक्षीस वितरण पार पडलं. फुटबॉलमध्ये कोल्हापूरच्या डी. वाय पाटील कॉलेज एज्युकेशन ट्रस्टचा संघ विजेता ठरला. स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचं पारितोषिक यजमान संघाच्या रोहित पडवळला देण्यात आलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**